**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढाव्यात रेपो दरात पाव टक्के कपात, आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज

- देशातली सर्वात मोठी औद्योगिक परिसंस्था विदर्भात तयार होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या विधानसभा निवडणुकी दरम्यान वाढलेल्या मतदार संख्येची चौकशी करण्याची महाविकास आघाडीची निवडणूक आयोगाकडे मागणी

**आणि**

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या ५ लाख अपात्र महिलांना वगळलं

**<><><><><>**

सर्वसामान्य कर्जदारांना दिलासा देत भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज रेपो दरात पाव टक्के कपात केली. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत एकमतानं हा निर्णय झाला. त्यामुळं रेपो दर साडे ६ टक्क्यावरुन सव्वा ६ टक्के झाल्याची माहिती गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. या समितीच्या निर्णयांविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड (१ मिनिट १० सेकंद)**

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
७ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

*(जागतिक पातळीवरच्या अस्थिर परिस्थितीचं कारण देत रिझर्व्ह बँकेनं आज आर्थिक वृद्धीदरांचा अंदाजही खाली आणला. त्यानुसार चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याची शक्यता आहे. गेल्या बैठकीनंतर, हा दर ६ पूर्णांक ६ टक्के राहण्याची शक्यता पतधोरण आढावा समितीनं वर्तवली होती. आगामी आर्थिक वर्षाचा आर्थिक वृद्धीदराचा अंदाजही ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवरुन ६ पूर्णांक ७ दशांश टक्के, इतका कमी केला आहे.*

*चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८ दशांश टक्के, तर आणि पुढच्या आर्थिक वर्षात ४ पूर्णांक २ टक्के राहिल, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे.*

*बँकांमधले घोटाळे कमी करण्यासाठी बँकांच्या वेबसाइटच्या नावात bank.in लावण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतला आहे. एप्रिलपासून याची सुरुवात होईल. त्यानंतर वित्तीय क्षेत्रातल्या इतर संस्थांच्या वेबसाइटच्या नावात 'fin.in' असा वापर केला जाईल. २४ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या यंदाच्या वित्तीय साक्षरता आठवड्याचा भर आर्थिक निर्णय घेण्यातली आणि घरखर्चातली महिलांची भूमिका सक्षम करण्यावर असेल, असंही रिझर्व्ह बँकेनं जाहीर केलंय. रिझर्व्ह बँकेच्या या पतधोरणाचं बँकिंग उद्योगानं स्वागत केलंय. बांधकाम उद्योजकांची संघटना असलेल्या क्रेडाईनं आणखी व्याजदर कपातीची अपेक्षा व्यक्त केली आहे.*

***आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून जीवन भावसार** .)*

**<><><><><>**

देशातली सर्वात मोठी औद्योगिक परिसंस्था विदर्भात, गडचिरोलीला केंद्रस्थानी ठेवून तयार होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री फडनवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज नागपूरमध्ये 'ॲडव्हान्टेज विदर्भ २०२५ औद्योगिक महोत्सवाचं' उदघाटन झालं. त्यावेळी ते बोलत होते. गडचिरोलीमध्ये होऊ घातलेल्या 'पोलाद क्रांती'चा फायदा या संपूर्ण प्रदेशाला होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

येत्या ५ वर्षांत गडचिरोली हे देशाचं पोलाद उत्पादन केंद्र म्हणून उदयाला येईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. लॉयड्स मेटल' सारख्या उद्योग समूहांनी गडचिरोलीत उद्योग उभारल्यामुळे

नक्षलवादाचा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सुटला असून, युवा वर्ग रोजगाराच्या माध्यमातून समाजाच्या मुख्य प्रवाहात येत असल्याचं ते म्हणाले.

उद्घाटनसत्राला नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे; उद्योगमंत्री उदय सामंत, आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

आगामी आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पावर आज लोकसभेत चर्चा झाली. चर्चेला सुरुवात करताना, केंद्रीय अर्थसंकल्प देशासमोरच्या कृषी आव्हानांना तोंड देण्यात अपयशी ठरला आहे, अशी टीका काँग्रेसचे धर्मवीर गांधी यांनी केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. तर देशात शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे नेते शिवपाल सिंह यांनी केला. एलपीजी सिलिंडरच्या किमतीत वाढ झाल्याचा मुद्दा तृणमूलच्या अभिषेक बॅनर्जी यांनी उपस्थित केला.

भाजपाचे राव राजेंद्र सिंह यांनी केंद्रीय अर्थसंकल्प हा गरीब, शेतकरी आणि महिलांचं हित जपणार असल्याचं म्हणत त्याचं कौतुक केलं. यानंतर लोकसभेचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व ११ खासदार उद्धव ठाकरे यांच्यासोबतच आहेत, कोणीही पक्ष सोडणार नाही असं खासदार अरविंद सावंत यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. केंद्र आणि राज्यातलं अपयश चर्चेत येऊ नये म्हणून जाणून बुजून अशा अफवांची राळ उडवली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सावंत

यांच्यासह संजय देशमुख, नागेश पाटील-आष्टीकर, संजय जाधव, राजाभाऊ वाजे, अनिल देसाई, भाऊसाहेब वाक्चौरे आणि पवन राजे निंबाळकर हे खासदार यावेळी उपस्थित होते. संजय राऊत, संजय दिना पाटील आणि प्रियंका चतुर्वेदी हे सर्व खासदार उद्धव ठाकरे यांच्याबरोबरच असल्याचं सावंत यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनेक नेते आपल्या संपर्कात असून टप्प्याटप्प्यानं ते शिवसेनेत येतील याचा पुनरुच्चार मंत्री उदय सामंत यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना केला.

**<><><><><>**

मुंबईत GBS, म्हणजेच गुइलेन-बॅरे सिंड्रोम या आजाराचा पहिला रुग्ण आढळून आल्याचं मुंबई महानगरपालिकेनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. एका ६४ वर्षीय महिलेला मज्जासंस्थेच्या आजाराला कारणीभूत ठरणाऱ्या या विषाणूचा संसर्ग झाल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्या वाढल्याच्या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी महाविकास आघाडीनं निवडणूक आयोगाकडे केली आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज नवी दिल्लीत संयुक्त वार्ताहर परिषदेत ही मागणी केली. निवडणूक आयोगानं दाद दिली नाही, तर आपल्याला न्यायालयाकडे जावं लागेल असं राहुल गांधी म्हणाले.

राज्यात प्रौढ लोकसंख्येपेक्षा जास्त मतदार होते, असा आरोप त्यांनी केला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान मतदारसंख्या ३९ लाखांनी कशी वाढली असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. या प्रश्नांची उत्तरं निवडणूक आयोगानं दिली पाहिजेत असं संजय राऊत म्हणाले. निवडणूक पारदर्शी पद्धतीनं घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

कॉँग्रेसला दिल्ली निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागणार असल्यानं राहुल गांधी विनाकारण असे प्रश्न उपस्थित करत आहेत, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली आहे.

राहुल गांधी यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची तपशीलवार लेखी उत्तरं दिली जातील, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. लोकशाहीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा  घटक असून त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देणं तसंच त्यांची मतं आणि सूचना ऐकून घेतल्या पाहिजेत असं आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरणाऱ्या ५ लाख महिलांना वगळण्यात आल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. त्यात संजय गांधी निराधार योजनेच्या २ लाख ३० हजार महिला, वय वर्षं ६५ पेक्षा जास्त वयाच्या १ लाख १० हजार महिला आणि कुटुंबातल्या सदस्यांच्या नावे चारचाकी असलेल्या तसंच नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी आणि स्वेच्छेने माघार घेणाऱ्या १ लाख ६० हजार महिलांचा समावेश आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पदकतालिकेत पुन्हा तिसऱ्या स्थानावर आला असून महाराष्ट्राकडे सर्वाधिक ९९ पदकं आहेत. त्यात २१ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४० कांस्यपदकांचा समावेश आहे. सेना दलांकडे एकूण ६४ पदकं असून त्यापैकी ३८ सुवर्ण पदकं असल्यानं ते पहिल्या स्थानावर आहेत. तर ३० सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

NCB, अर्थात अमली पदार्थ विरोधी पथकानं गेल्या आठवड्यात नवी मुंबईत केलेल्या कारवाईत अंदाजे २०० कोटी रुपये किमतीचे विविध प्रतिबंधित पदार्थ जप्त केले. या कारवाईत NCB नं ४ जणांना अटक केली आहे.

**<><><><><>**

अजिंठा नागरी सहकारी बँकेच्या ठेवीदारांच्या गैरव्यवहारप्रकरणी काँग्रेसचे माजी विधान परिषद सदस्य आणि बँकेचे अध्यक्ष सुभाष झांबड यांना आज पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरात त्यांच्या घरातून अटक केली.

**<><><><><>**

राज्याच्या कृषी विभागात बॅटरी स्प्रेअर खरेदीत २३ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. महायुती सरकारमध्ये कृषी विभाग हा भ्रष्टाचाराचं कुरण बनल्याची टीकाही पटोले यांनी केली आहे.

**<><><><><>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसांत राज्यातलं हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**